


# वर्ण / जाति


**१) <u>वर्णव्यवस्था व जातीप्रथा</u> :**

ऋग्वेद काळात ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य आणि शुद्र अशी चार्तुण्यव्यवस्था विकसित झाली होती. ती उत्तरवैदिक काळात अधिक ताठर होऊन त्यातील बंधने कडक झाली. परस्पर वर्णातील विवाह व खानपान बंद होत गेले. एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाण्याचे स्वातंत्र्य राहिले नाही. वर्ण हा जन्मावरुन ठरविला जाऊ लागला. त्यामुळे ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मण किंवा शुद्राचा मुलगा शुद्र मानण्याची प्रथा रुढ झाली. पराजित अनार्यांना शुद्र म्हणून अत्यंत हिन प्रकारची वागणूक देण्यात आली. प्रत्येक वर्णीयांच्या अधिकारात व दर्जात फरक करण्यात आला. वर्णव्यवस्थेच्या विकृतीमधून जातीप्रथा उदय पावली. सुतार, लोहार, सोनार, चर्मकार, कोळी व कोष्टी इ. जाती व्यवसायावरुन निर्माण होत गेल्या. जातिप्रथेच्या उदयामुळे उत्तरवैदिक कालखंडापासून सामाजिक विषमतेला प्रारंभ झाला.



असल्यामुळे आर्यांचा मोठा संघटित समाज उदयास आला. त्याच संघटित समाजात कालौघात वर्णव्यवस्था उगम पावल्याचे दिसते. ऋग्वेद, शतपथ व तैतिरीय ब्राह्मण ग्रंथांमधून आलेल्या उल्लेखांवरुन प्रारंभी फक्त ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीनच वर्ग किंवा वर्ण अस्तित्त्वात असल्याचे दिसते. ए. एल. बाशम आणि रोमिला थापर यासारख्या इतिहासकारांनी असे सूचित केले आहे की, आर्य भारतात आले तेव्हाच त्यांचे तीन सामाजिक वर्गांमध्ये विभाजन झालेले होते. पण त्यावेळी जातिसंस्था विकसित झालेली नव्हती. लढवय्ये व जमातींचे म्होरके, पुरोहित आणि जमातीतील सर्वसामान्य लोक असे तीन वर्ग पडलेले होते.[२]

या तीन वर्गातील/वर्णातील व्यक्तींनाच ‘द्विज’ म्हणत. उपनय संस्काराद्वारे त्यांना द्विजत्व येते असे मानल्या जाई. कालांतराने या त्रिवर्णव्यवस्थेत आर्यांकडून पराभूत  झालेल्या मूळनिवासी असलेल्या अनार्यांना आर्यांनी ‘शुद्र’ हा चवथा वर्ण निर्माण करुन समाविष्ट केले. कालोघात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार वर्णांची ताठर चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था प्रस्थापित झाली.




समाजव्यवस्थेत चार वर्ण कसे निर्माण झाले याचे मोठे कल्पक व रंजक वर्णन ऋग्वेदातील पुरुष सुक्तामधून आलेले आहे. विराट समाजपुरुषाचे मुख म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय म्हणजे हात, वैश्य म्हणजे मांड्या आणि शुद्र म्हणजे पाय असुन, प्रत्यक्ष देवतांनीच हे वर्ण निर्माण केले असल्याचे वर्णन पुरुष सुक्तातील श्लोकातून केलेले आहे.[३] पुरुषसुक्तातून वर्णव्यवस्थेच्या निर्मितीसंबंधी सांगण्यात आलेल्या याच कथानकाची रीघ पुढे मनुस्मृतीनेही ओढली.

अभ्यासकांच्या मतांनुसार, समाजातील सर्व लोकांमध्ये कामाची विभागणी व्हावी या मुख्य गरजेतुन आणि जीवन जगण्याच्या प्रयत्नातील स्पर्धा व संघर्ष टाळण्यासाठी ऋग्वेदकालीन अभिजनांनी तत्कालीन जीवनपद्धतीला अनुरुप अशा वर्णांची रचना केली असावी.



प्रत्येक वर्णाचे कर्म (कार्य) हे पुढीलप्रमाणे ठरवुन देण्यात आलेले होते.


i) ब्राह्मण : बौद्धिक व धार्मिक कामे करणारा 'ब्राह्मण' समजला जाई. वेदांची रचना करणे, वेदाभ्यास करणे, धार्मिक विधी पार पाडणे, ज्ञानार्जन करणे, ज्ञानदान करणे, यज्ञ (यजन) करणे ही कामे ब्राह्मणांसाठी सांगितली होती.



ii) क्षत्रिय : ज्याच्या बाहुत सामर्थ्य आहे, जो धाडसी व पराक्रमी आहे, जो जनपदांचे 'क्षति' (नुकसान) पासून रक्षण करतो तो 'क्षत्रिय' समजल्या जात असे. रणांगणावर युद्ध करुन राष्ट्राचे रक्षण करण्याची जबाबदारी क्षत्रियांवर होती.




iii) वैश्य : समाजाच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक वस्तूंची निर्मिती करणारा, राष्ट्रातील कृषिव्यवस्था, व्यापार व उद्योग सांभाळणारा 'वैश्य' मानलेला होता. वैश्य हा अर्थव्यवस्थेचा कणा होता. राष्ट्र चालविण्यासाठी आवश्यक कर याच वर्गाला द्यावे लागत.



iv) शुद्र : आर्यांनी पराभूत अनार्यांना आपल्या व्यवस्थेत ‘शुद्र’ म्हणून समावुन घेतले. शुद्र हे कृष्णवर्णीय, बुटके, चपट्या नाकाचे, यज्ञ न करणारे व आर्यांच्या देवता न मानणारे होते. आर्य त्यांना ‘दस्यू’ (दास) समजत. त्रैवर्णिक आर्यांची (ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य) सेवा करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले होते. शुद्रांना मालमत्तेचा व विवाहाचा हक्क नव्हता. शुद्र दासांना भेट व दान म्हणून इतरांना देण्याची प्रथा होती.







वर्णव्यवस्था निर्मितीच्या प्रारंभिक काळात लवचिक होती. वर्णा वर्णात विशेषत: त्रैवर्णिकात रोटीबेटी व्यवहार होते तसेच एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाण्याची मुभा होती. वर्ण हा पात्रता व कामावरुन (गुण-कर्म) ठरविला जात असावा. वर्ण जन्मावरुन ठरविण्याची प्रथा प्रारंभिक काळात रुढ झालेली नव्हती. वर्णव्यवस्थेत प्रवाहित्व व लवचिकता होती. पण ऋग्वेदकाळाच्या शेवटी-शेवटी

वर्णव्यवस्थेतील प्रवाहित्व व लवचिकता संपुष्टात आली. वर्णव्यवस्थेतील बंधने कडक झाली. वर्णा-वर्णातील रोटीबेटी व्यवहार बंद झाले. वर्ण जन्माधिष्ठीत बनला परिणामी एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाण्याचे स्वातंत्र्य संपुष्टात आले. वर्णाच्या शुद्धीवर सर्वाधिक भर देण्यात आला. वर्णसंकर निषिद्ध ठरविला गेला. वर्णसंकरातून निर्मित संततीला समाजातील सर्वात खालचे स्थान दिले गेले. त्यांना अंत्यत हीन वागणूक दिली गेली. वर्णव्यवस्था परिदृढ व विकृत बनली. याच विकृतीतून 'जातिप्रथा' उदय पावली. अनेक राजवटी आल्या व गेल्या पण ऋग्वेदोत्तर काळापासून ताठर बनत गेलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था अधिकाधिक ताठर व कठोर बनत गेली. देशातील संपुर्ण मानव संसाधन चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या बंधनात अडकून पडून देश पारतंत्र्यात लोटला गेला ! भारताचा ऱ्हास व अध:पतन घडून

### ३.१.२ जातिव्यवस्था

भारतीय समाजाचे सर्वात प्रमुख व व्यवच्छेदक लक्षण म्हणजे जातिव्यवस्था होय. जातिव्यवस्था ही केवळ भारतात व ज्या ठिकाणी भारतीय गेले त्या ठिकाणच्या भारतीयांमध्ये आहे. या जातिव्यवस्थेने भारतीय समाजाची कप्पेबंद विभागणी करुन समाजाचे उच्च नीच स्तरांमध्ये विभाजन करुन कायमस्वरुपी विषमता निर्माण केली. भारतीय समाजाला विषमताधिष्ठित बनविणाऱ्या जातिव्यवस्थेची निर्मिती कुणी व कशी केला हा अभ्यासकांमधील संशोधनाचा विषय आहे.

जातिव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे असा भ्रम उच्च जातीयांनी निर्माण केला. याउलट जातिव्यवस्था ही बहुजन - शुद्र जाती व स्त्रिया यांच्या शोषणासाठी निर्माण केलेली कृत्रिम व्यवस्था आहे असा सिध्दांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला.



गुप्तोत्तर कालखंडामध्ये स्थानिक जातिच्या निर्मितीची प्रक्रीया वेगाने झाल्याचे मानले जाते[७] कालौघात वर्ण व जातीप्रथा ही वंशपरंपरागत बनली. पुढे व्यवसायावरुनही अनेक जाती निर्माण झाल्या (वर्तमान भारतात जवळपास पाच हजार जाति असून हजारो पोटजाति आहेत म्हणजेच एकभाषा बोलणाऱ्या भारतातील एका एका राज्यात सरासरी ३०० जाति अस्तित्त्वात आहेत.

